MHYA130008102018

## नि. क्र. १७४ खालील आदेश

१) प्रस्तूतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश १२ नियम–६ अन्वये दाखल केलेला आहे. त्यामध्ये वादीचे थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादी यांनी नि. क्र. १७१ अन्वये प्रतीदावा दाखल करण्याची परवानगी मिळण्याकरीता अर्ज दाखल केलेला आहे. तसेच सदर अर्जात प्रतिवादी यांनी दावा मिळकतीवरील वादीचा कब्जा मान्य केलेला आहे. त्यामुळे वादी यांनी सदर प्रतिवादी यांच्या नि. क्र. १७१ मधील अर्जातील कबूलीच्या आधारे प्रस्तुत दाव्यात न्यायनिर्णय पारीत करण्याची विनंती केलेली आहे.

२) प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी नि. क्र. १७५ अन्वये त्यांचा लेखी खुलासा दाखल करुन, सदर अर्जास तीव्र विरोध दर्शविला आहे. त्यामध्ये सदर प्रतिवादी यांचे थोडक्यात कथन असे आहे की, सदर दावा मिळकती बाबत विविध प्रकरणे प्रलंबित असुन, मा. उच्च न्यायालय खंडपीठ, नागपुर येथे देखील एक प्रकरण प्रलंबित आहे. तसेच प्रस्तुत दाव्यातील हरकत अडथळ्या बाबतचा मुद्दा देखील गुणवत्तेवर निर्णीत करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

३) प्रस्तूतचा अर्ज त्यावरील लेखी खुलासा व अभिलेखावरील सर्व दस्तऐवजांचे अवलोकन केले. तसेच दोन्ही पक्षकारांच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

४) प्रस्तूत दावा वादी यांनी दावा मिळकतीवरील त्यांच्या कब्जे वहिवाटीस प्रतिवादी यांनी हरकत अडथळा करु नये, म्हणून कायम मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. तसेच प्रस्तूत दावा प्रतिवादी यांनी वादीचा उलटतपास घेण्याकरीता प्रलंबित

आहे. प्रस्तुत अर्जातील मागणीचा गुणवत्तेवर विचार केला असता, प्रतिवादी यांचा नि. क्र. १७१ वरील प्रतीदावा दाखल करण्यास परवानगी मिळण्याबाबतचा अर्ज, या न्यायालयाने गुणवत्तेवर नामंजूर केलेला आहे. तसेच नि. क्र. १७१ वरील प्रतिवादींच्या सदर अर्जातील मजकूराचे अवलोकन केले असता, त्यामध्ये प्रतिवादी यांनी दावा मिळकतीच्या ताब्या बाबतचे केलेले कथीत कथन हे स्पष्ट व असंदिग्ध नाही.

५) तसेच दुसरी महत्वाची बाब म्हणजे प्रस्तुत दाव्यातील दावा मिळकतीच्या हरकत अडथळ्या बाबतच्या वाद मुद्दा क्रमांक २ चा निष्कर्ष देखील उपलब्ध पुराव्याच्या आधारे गुणवत्तेवर नोंदविणे आवश्यक आहे. त्यामुळे उपरोक्त सर्व परिस्थिती विचारात घेता, प्रस्तुत दाव्यात वादीच्या मागणी प्रमाणे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १२ नियम– ६ अन्वये न्यायनिर्णय पारीत करणे योग्य होणार नाही. एकंदरीत वरील कारणमीमांसेचा विचार केला असता, प्रस्तूत अर्ज नामंजूर करणे आवश्यक आहे.

करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**आदेश**

प्रस्तूत अर्ज नामंजूर करण्यात येतो.

Digitally signed by BHARAT SANTARAM JAGDALE
Date: 2025.03.05 16:41:19 +0530

दि. ०५/०३/२०२५

(भरत सं. जगदाळे)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र. १, दिग्रस